# मुले पूर्णांशाने शिकतात

पठडीबद्ध शिक्षणाच्या व्यवस्थेमध्ये परीक्षांतील गुणांच्या मापाने उत्तीर्णता ठरविली जाते, आणि अगदी पस्तीस टक्क्यांना मुलांना उत्तीर्ण ठरविले जाते. कुठेच कधीही , अभ्यासक्रमाच्या आकलनाबाबत शंभर टक्क्यांची अपेक्षाच धरली जात नाही. त्यामुळे होते असे की दरवर्षीच्या "ज्ञाना'बरोबरच राहून गेलेल्या "अज्ञाना 'चा डोंगरही वाढतच जातो. परीक्षांतील गुण मुलांच्या ज्ञानाची नि त्याहीपेक्षा आकलनाची पातळी कितपत व्यक्त करतात याविषयी नेहमीच शंका प्रदर्शित केली जाते. क्षणभर हा परीक्षा पद्धतीचा अपुरेपणा दूर सारला तरी आपली मानसिकताच आपण अशी करून ठेवली आहे की अपूर्ण शिक्षणातही आपण समाधानी असतो. कमी प्रमाणातील अपूर्णतेचे गोडवे गातो.

तज्ज्ञांनी शालेय अभ्यासक्रम हा मुलांच्या विविध शारीरिक वयाच्या क्षमतांनुसार आखला असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याने पूर्णांशाने शिकण्याची अपेक्षा आपण का धरू नये ? वर्गपद्धतीच्या शिक्षणात आणि तुलनात्मक मूल्यमापनात अशी अपेक्षा करता येत नाही हे खरे आहे. पण प्रत्येक मुलगा नि मुलगी शाळेत येऊन आपल्या शिक्षणासाठी , आयुष्यातील शिकण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची , प्रभावी अशी वर्षे वाया घालवणार असतील तर त्यांना सर्वच शिक्षण शंभर टक्क्यांनी प्राप्त होईल अशी हमी संबंधित प्रौढांनी द्यायला नको काय ?

सर्वसाधारण (नॉर्मल ) मुले सर्वच विषयांतील सर्वच संकल्पना पूर्णांशाने आत्मसात करू शकतात , असे मला वाटते. प्रत्येक मुलाचा समजावून घेण्याचा वेग निराळा असेल , कल वेगवेगळा असेल , त्याला त्याला मिळालेला बहुविध बुद्धिमत्तांचा पट वेगवेगळा असेल नि त्यानुसार त्याचा दृष्टिकोण वेगळा असू शकेल ; पण योग्य संधी दिल्यास , तशी साधने उपलब्ध करून दिल्यास, प्रत्येकास पुरेसा अवधी आणि आकलनास पुरेसा अवकाश दिला तर, मुले, पूर्णांशाने विषय आत्मसात करू शकतात. त्यासाठी शिक्षण व्यक्तिगत स्वरूपाचे असावे लागेल.

पण, आत्ताच्या शालेय व्यवस्थेत हे घडू शकणार नाही. कारणे अनेक दिसतात. सर्वच मुले पूर्णांशाने शिकतील , म्हणजेच प्रत्येक मूल पूर्णांशाने शिकेल अशी जबाबदारीच शिक्षकांवर टाकलेली नसते. शिवाय शाळांतून "शिकविण्या'चेच कार्य चालते , त्यालाच मध्यवर्ती स्थान दिलेले असते. वर्गांतून "शिकण्या'चे कार्य मात्र दुलक्षिले जाते. वास्तविक प्रत्येक मूल स्वतंत्रपणे शिकत असते , आपण मात्र संपूर्ण वर्गाला शिकवतो. सर्वांनी एकाच वेळी , एकच गोष्ट , एकाच पद्धतीने शिकली पाहिजे , आत्मसात केली पाहिजे, असे त्यामधील गृहीत असते. परीक्षासुद्धा केवळ लेखी केवळ दीड-दोन-तीन तासांची आणि ठोकळेबाज असे केवळ पाठांतराने उत्तरे

देता येतील असे प्रश्न आणि मुख्य म्हणजे तात्पुरत्या स्मृतीला सारे महत्त्व; आकलनाची अपेक्षा नाही. यामुळे आपण सगळयांना सगळे शिकू द्यायला वावच देत नाही.

मुलांना, खरे तर , शिकायचे असते. स्वप्रयत्नांनी शिकायचे असते. मुलांना विविध विषयांतील विविध घटकांचा , त्यातील बारकाव्यांचा अर्थपूर्ण शोध घ्यायला खूप आवडतो. वैयक्तिक संधीमुळे मुले अभिमानाने स्वयंशिक्षण करीत जातात. यासाठी अर्थातच , अनुभवाधारित शिक्षणपद्धतींचा अवलंब करावा लागतो. शाळा हे करू इच्छित नाहीत हा खरा आजच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न आहे.

शाळा काय करतात यापेक्षा मुले कशी शिकतात, हा खरा पालकांच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. करावयाच्या कित्येक गोष्टी शाळा करत नाहीत, म्हणून मुले स्वयंप्रेरणा, स्वयंस्फूर्ती आणि स्वयंशिक्षणापासून फारकत घेत

आहेत ही पालकांच्या दृष्टीने काळजीची गोष्ट आहे. कित्येकदा शाळा, आपले शिक्षण चांगले आहे असे भासविण्यासाठी बऱ्याचशा अशैक्षणिक गोष्टींचा बडेजाव आपल्या शाळांतून माजवतात. भपकेदार शाळा ही प्रभावी शिक्षण देते असा गैरसमजही होतो.

विद्यार्थीकेंद्री, विद्यार्थ्यांना स्वशिक्षणास प्रवृत्त करणारी, मुलांना आपल्या नैसर्गिक क्षमतांचा वापर करून ज्ञानग्रहण करू देणारी अशी शाळा मिळणे, हे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीने अत्यावश्यक असते. शाळा अशी नसेल तर तिला पालकांनी, आपल्या पाल्यांचे हित डोळयांसमोर ठेवून नकार द्यायला हवा. पालकांना वैयक्तिकरित्या हे जमेलच असे नाही. आणि आज समाजात, शास्त्रीय शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आग्रह धरणारी अशी पालकांची संघटनाही नाही.

अशा विपरीत परिस्थितीत एक आशेचा किरण आहे. पालक स्वत:च स्वतःच्या पाल्यांचे शिक्षक होऊ शकतात. फारसा वेळ नसला तरी थोडा वेळ देऊनही, मुले निसर्गत: असतात कशी, निसर्ग नियमांनी वाढतात कशी आणि नैसर्गिक मेंदूच्या क्षमतांनी शिकतात कशी हे पालकवर्ग समजावून घेऊ शकेल. आपल्या स्वतःच्या मुला-मुलीसाठी पालकांनी शाळांवर फारसे विसंबून न राहता घरीच मुलाला साहाय्य करावे. आपले घरच सारे शिकते घर करावे.

❖